## प्रकरण दुसरे

## भाँ ठ व त

## प्रकरण दुसरे

## भांडवल

### प्रस्तावना:

कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवसाय करावयाचा असेल तर त्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. भांडवल हा आर्थिक व्यवसायाचा पायाभूत आधार असतो. सहकारी संस्थाही विविध प्रकारचे व्यवसाय करीत असतात. सभासदांना कर्जपुरवठा करण्यासाठी व स्वत:च्या विविध व्यवहारासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते.

### २:१ भांडवलाची गरज:

कोणत्याही प्रकारच्या सहकारी संस्थेस खालील प्रकारच्या भांडवलाची गरज असते —

#### १) स्थिर भांडवल किंवा दीर्घ मुदतीचे भांडवल:

सहकारी संस्थांना आपला व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रथम दीर्घ मुदतीचे किंवा स्थिर स्वरुपाचे खर्च भागविण्यासाठी या भांडवलाची गरज असते. उदा. जमीन,इमारत, यंत्र-सामुग्री इ.

#### २) खेळते भांडवल किंवा अल्प मुदतीचे भांडवल:

संस्थेना दैनंदिन कारभार व व्यवहार खर्च भागविण्यासाठी या भांडवलाची गरज असते. उदा. संस्थेच्या कर्मचा-यांचा पगार, विजेचे बिल देणे, विमा हप्ता, देणे, भाडे इ. प्रकारचा खर्च यात समाविष्ट करण्यात येतो. यास खेळते भांडवल असे म्हणतात. कारण व्यवहार (उत्पादन) वाढल्यास हा खर्च वाढतो तसेच उत्पादन कमी झाल्यास हा खर्च कमी होतो.

३) संघटन निधी:

सहकारी संस्थांना प्रारंभी नोंदणीसाठी व प्राथमिक खर्चासाठी भांडवलाची गरज असते. त्याचा या प्रकारच्या भांडवलात समावेश होतो. उदा. परवाना फी, नोंदणी फी, कायदेशीर निधी व इतर खर्च.

सहकारी संस्थेला आपला स्थापनेचा खर्च, स्थिर स्वरूपाचा खर्च व दैनंदिन व्यवहारासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी जास्तीत जास्त भांडवलाची गरज असते. ही भांडवलाची गरज त्यांच्या व्यवसायाच्या स्वरूपा-नुसार कमी-जास्त प्रमाणात असते.

२:२ भांडवलाचे वर्गीकरण:

सहकारी संस्थांच्या भांडवलाचे सर्वसाधारण वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात येते.

अ) अंतर्गत भांडवल

ब) बाह्य भांडवल

अंतर्गत भांडवलात संस्थेचे भाग भांडवल, राखीव निधी व इतर निधींचा समावेश होतो. काही वेळेला सभासदांच्या ठेवींचाही त्यामध्ये समावेश केला जातो.

बाह्य भांडवलात इतर विविध संस्थांकडून घेतलेल्या कर्जाचा समावेश होतो. या दोन्ही मार्गांनी जास्तीत जास्त भांडवल उभे करण्याचा प्रयत्न केला जातो.

अशा प्रकारे भांडवल उभे करताना सहकारी संस्थेला आपल्या व्यवसायाच्या नजीकच्या गरजा लक्षात घ्याव्या लागतात. तसेच उभ्या केलेल्या भांडवलाचा,

अथवा व्यवसाय वाढविण्यासाठी कार्यक्षमरित्या वापर करणे आवश्यक असते. भांडवलाच्या कार्यक्षम वापरामुळे संस्थेचा आर्थिक पाया भक्कम होण्यास मदत होते. तसेच संस्थेच्या निकोप वाढीसही मदत होते. सहकारी तत्त्वांना धरून बहुसंख्य सभासदांच्या विकासासाठी भांडवल योग्यरीतीने वापरणे जरूरीचे आहे.

२:३ शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढीची भांडवल रचना:

पतपेढी संस्थेच्या नियमावली व उपविधीत नमुद केले प्रमाणे शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेस खालील साधनांनी भांडवल जमा करता येते :

अ) भागांच्या रूपाने - १) सदस्याकडून
२) सरकारकडून - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत.

ब) ठेवींच्या व वर्गणीच्या रूपाने - सदस्यांकडून

क) कर्जाच्या रूपाने

ड) देणगीच्या रूपाने

इ) प्रवेश फीच्या रूपाने

संस्थेच्या भांडवलाचा उपयोग मुख्यत: तिच्या सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याकरिता केला जातो.

२:४ भाग भांडवल:

"सहकारी संस्थेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना आपले भाग (शेअर) विकून जे भांडवल उभे केले जाते त्यास भाग भांडवल असे म्हणतात."

सहकारी संस्थेच्या घटना पत्रकात आणि पोटनियमात व्यवसायासाठी जास्तीत जास्त किती मर्यादेपर्यंत भांडवल उभे करता येईल याचा उल्लेख असतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

या भांडवलास "अधिकृत भांडवल" असे म्हणतात. या अधिकृत भांडवलाचा काही भाग विक्रीस काढला जातो. या भांडवलास "विक्रेय भाग-भांडवल- असे म्हणतात. विक्रीस काढलेल्या भाग भांडवलापैकी जेवढे लोकांनी खरेदी करण्याची तयारी दर्शविली असेल तेवढ्या भांडवलास "स्वीकृत भांडवल" असे म्हणतात. भागधारकांनी स्वीकारलेल्या भांगांच्या दर्शनी रकमेपैकी जेवढी रक्कम भागधारकाने प्रत्यक्ष भरलेली असते आणि अशा रीतीने जेवढे भांडवल प्रत्यक्ष गोळा होते त्यास "वसूल भांडवल" असे म्हणतात. बहुधा साधारण भाग विकूनच असे भांडवल उभे केले जाते.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे भाग भांडवल हे भांडवल उभारणीचे प्रमुख साधन आहे. भाग भांडवल हे सभासदांनी खरेदी केलेल्या भागांच्या रकमेच्या स्वरूपात जमा केले जाते. संस्थेच्या प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. १०.०० असून एकूण भाग भांडवलाची कमाल मर्यादा रुपये ५०,००,०००.०० आहे. आणि एकूण भागांची संख्या ५,००,०००.०० आहे.

प्रत्येक सदस्याने कमीतकमी एक भाग खरेदी केलाच पाहिजे. तसेच प्रत्येक सदस्याने मासिक वेतनातून कमीत कमी रु. १० वर्गणी व रु. २० मासिक ठेव दिली पाहिजे अशी नियमात तरतूद केली आहे. त्यामुळे संस्थेचे भांडवल वाढण्यास मदत होते. पतसंस्थेच्या नियमानुसार संस्थेच्या एकूण भागांच्या १/५ भागापेक्षा किंवा वीस हजार रुपयापेक्षाजास्त किंमतीचे भाग कोणत्याही सभासदास धारण करता येत नाहीत.

भाग भांडवलातील वाढ:

भाग भांडवलातील वाढ दोन घटकांवर अवलंबून असते.

१) सभासद संख्या

२) एकूण दिलेली कर्जे

सभासद संख्येचा विचार करता प्रत्येक सभासद कमीत कमी एक तरी भाग धारण करतो. त्यामुळे सभासद संख्येत वाढ झाल्यास एकूण भाग भांडवलामध्ये वाढ होते. तसेच सभासदांना दिलेल्या कर्जापैकी ठराविक रक्कम ही भाग भांडवलात जमा केली जाते. त्यामुळे जेवढे कर्ज वितरण अधिक तेवढी भाग-भांडवलात वाढ होते.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या भाग भांडवलातील वाढ पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

## कोष्टक क्र. २:१

### भाग भांडवलातील वाढ

| अ.नं. | वर्षे(३० जून) | भाग भांडवल (रु.) | भाग भांडवलातील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १ | १९६९-७० | उपलब्ध नाही | — |
| २ | १९७०-७१ | ६,१७५.०० | — |
| ३ | १९७१-७२ | ९,६६५.०० | ५६.५२ |
| ४ | १९७२-७३ | १४,४४५.०० | ४९.४६ |
| ५ | १९७३-७४ | ३१,०६५.०० | ११५.०६ |
| ६ | १९७४-७५ | ५५,२८५.०० | ७७.९६ |
| ७ | १९७५-७६ | ८४,६४०.०० | ५३.१० |
| ८ | १९७६-७७ | १,२७,८७०.०० | ५१.०७ |
| ९ | १९७७-७८ | १,८४,९३०.०० | ४४.६२ |
| १० | १९७८-७९ | २,५५,७००.०० | ३८.२७ |
| ११ | १९७९-८० | ३,३३,६३०.०० | ३०.४८ |
| १२ | १९८०-८१ | ४,०७,८७०.०० | २२.२५ |
| १३ | १९८१-८२ | ६,११,१५०.०० | ४९.८४ |
| १४ | १९८२-८३ | ८,०४,१४०.०० | ३१.५८ |
| १५ | १९८३-८४ | ११,०६,१००.०० | ३७.५६ |
| १६ | १९८४-८५ | १५,३४,१६०.०० | ३८.७० |
| १७ | १९८५-८६ | २१,६४,४२०.०० | ४१.०८ |
| १८ | १९८६-८७ | २४,५२,०४०.०० | १३.२९ |
| १९ | १९८७-८८ | २८,९२,५४०.०० | १७.९६ |
| २० | १९८८-८९ | ३५,२४,८६०.०० | २१.८५ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७०-७१ ते १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

कोष्टक क्र.२:१ वरून असे दिसून येते की, १९७०-७१ साली भाग भांडवल रु. ६,१०५.०० होते, त्यामध्ये १९७३-७४ पर्यंत रु. ३१,०६५.०० एवढी वाढ झाली आहे. म्हणजेच ही वाढ ४०३.०८ टक्के झाली आहे. त्याचप्रमाणे १९७४-७५ ते १९७८-७९ या कालावधीत भाग भांडवलातील वाढ ३६२.५ टक्क्यानी झाली आहे. यापुढील पाच वर्षांच्या कालावधीमध्ये भाग भांडवल २३१.५३ टक्क्यानी वाढले आहे. मात्र १९८४-८५ ते १९८८-८९ या कालावधीत ही वाढ फक्त १२९.७३ टक्के झाली आहे. यावरून असे दिसून येते की, एकूण भाग भांडवल वाढत असून भाग भांडवल वाढीच्या वार्षिक टक्केवारीत मात्र घट होते आहे. कारण संस्थेचे सभासद संख्या वाढीचे प्रमाण या काळात घटल्याने भाग भांडवलात घट दिसून येते.

१९७०-७१ ते १९८८-८९ या एकोणीस वर्षांच्या कालावधीमध्ये भाग भांडवलातील वाढ ५६९७६.६० टक्के झाली आहे. तर सरासरी वार्षिक वाढ ही ४१.६१ टक्के आहे. भाग भांडवलातील सर्वाधिक वाढ १९७३-७४ साली ११५.०६ टक्क्यानी झाल्याचे दिसून येते. भाग भांडवल वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे सभासद संख्येतील वाढ होय. यावर्षी सभासद संख्या १९.४५ टक्क्यानी वाढली आहे. आणि संस्थेचे सभासद होताना प्रत्येक सभासदास कमीत कमी एक भाग (शेअर) खरेदी करावा लागतो. त्यामुळे भाग भांडवल वाढले आहे. या उलट १९८६-८७ मध्ये भाग भांडवलातील वाढ सर्वात कमी झाली आहे ही वाढ फक्त १३.२९ टक्के झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सन १९८६-८७ मध्ये सभासद संख्या फक्त ३.१९ टक्क्यानी वाढली आणि यावर्षी कर्ज वितरण फक्त १०.०९ टक्क्यानी वाढले आहे. या दोन कारणांमुळे भाग भांडवलामध्ये कमी वाढ झाल्याचे दिसून येते.

२:५ खेळते भांडवल:

संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये वसूल भाग भांडवल, रिझर्व्ह निधी,

इतर निधी, ठेवी, प्रॉव्हिडंड फंड, बाहेरील कर्ज, नफा-तोटा व इतर देणी यांचा समावेश होतो. यामध्ये राखीव निधीचे प्रमाण एकूण भांडवलाच्या २५ टक्के असते. संस्थेच्या एकूण खेळत्या भांडवलातील वाढ ही कर्ज आणि व्यवहार यातील वाढ दर्शविते की ज्यावर संस्थेची उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता अवलंबून असते.

कोष्टक क्र. २:२

खेळत्या भांडवलातील वाढ

| अ.नं. | वर्ष(३० जून) | खेळते भांडवल (रु.) | खेळत्या भांडवलातील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १ | १९६९-७० | उपलब्ध नाही | --- |
| २ | १९७०-७१ | २२,७५७.९० | --- |
| ३ | १९७१-७२ | २९,३१२.६२ | २८.८० |
| ४ | १९७२-७३ | ३९,७११.०३ | ३५.७५ |
| ५ | १९७३-७४ | ६०,५७२.४० | ५२.२३ |
| ६ | १९७४-७५ | ९१,९६८.५३ | ५१.८३ |
| ७ | १९७५-७६ | १,२८,५३८.०६ | ३३.७६ |
| ८ | १९७६-७७ | १,८२,०१०.०० | ४१.६० |
| ९ | १९७७-७८ | २,५३,३३५.०० | ३९.२२ |
| १० | १९७८-७९ | ३,४०,२८०.०० | ३४.२९ |
| ११ | १९७९-८० | ४,३९,५७८.०० | २९.१८ |
| १२ | १९८०-८१ | ५,५६,६२०.०० | २६.६३ |
| १३ | १९८१-८२ | १६,७६,०६५.७५ | २०१.११ |
| १४ | १९८२-८३ | १८,८३,३४३.३३ | १२.३७ |
| १५ | १९८३-८४ | २७,७२,९८१.७३ | ४७.२२ |
| १६ | १९८४-८५ | ३७,८२,५३०.२५ | ३६.४२ |
| १७ | १९८५-८६ | ६३,११,६३०.३० | ६६.८६ |
| १८ | १९८६-८७ | ९१,४०,७१४.७५ | ४४.८२ |
| १९ | १९८७-८८ | १,०१,३६,६४१.८० | १०.८९ |
| २० | १९८८-८९ | १,१४,११,२४७.५० | १२.६६ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे 1970-71 ते 1988-89 पर्यंतचे वार्षिक अहवाल.

9648

कोष्टक क्र. २:२ वरून असे दिसून येते की, सन १९७०-७१ मध्ये खेळते भांडवल रु. २२,७५७.१० होते. त्यामध्ये १९७३-७४ पर्यंत रु. ६०,५७२.४० एवढी वाढ झाली म्हणजेच ही वाढ १६६.१६ टक्के असल्याचे दिसून येते. सन १९७४-७५ ते १९७८-७९ या पाच वर्षांच्या कालावधीत खेळत्या भांडवलातील वाढ फक्त २६९.९१ टक्के झाली आहे. मात्र यापुढील पाच वर्षांच्या कालावधी-मध्ये खेळत्या भांडवलातील वाढ ५३०.७६ टक्क्यानी झाली आहे. ही वाढ होण्याचे कारण म्हणजे या काळात मासिक ठेवी व कर्ज वितरण अनुक्रमे २५७.९९ टक्के व ३६७.९४ टक्के पर्यंत वाढले आहे. तसेच १९८४ ८५ ते १९८८-८९ या पाच वर्षांच्या कालावधीत २०९.८९ टक्कयानी खेळते भांडवल वाढले आहे.

संस्थेच्या खेळत्या भांडवलातील महत्तम वाढ १९८१-८२ साली झाली आहे. ही वाढ २०१.११ टक्के झाली आहे. खेळत्या भांडवलात वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे ठेवीतील वाढ सर्वात अधिक होती. तर संस्थेने यावर्षी कर्ज मर्यादा वाढविल्याने (३००० रुपयावरून ५००० रुपये) बँकेकडून रुपये ८,४०,००० एवढे कर्ज घेतल्याने यावर्षी कर्ज पुरवठयात सर्वाधिक वाढ म्हणजे १३७.६० टक्के झाली आहे. त्यामुळे खेळते भांडवल वाढले आहे.

त्याचप्रमाणे खेळत्या भांडवलातील सर्वात कमी वाढ १९८७-८८ साली फक्त १०.८९ टक्के झाली आहे. कारण यावर्षी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे प्रमाण ३.१ टक्कयानी घटले आहे. परिणामी कर्ज पुरवठा फक्त १०.०१ टक्कयानी वाढला आहे. तसेच सभासदांच्या ठेवी व भाग भांडवलात अनुक्रमे १६.४३ टक्के व १७.९६ टक्के वाढ झाली आहे. यामुळे खेळते भांडवल वाढ घटल्याचे दिसून येते.

सन १९७०-७१ ते १९८८-८९ या एकोणीस वर्षांच्या कालावधीत खेळत्या भांडवलातील वाढ ५०,०७७ टक्के झाली आहे मात्र वार्षिक सरासरी वाढ ४२.७२ टक्के झाली आहे.

संस्थेच्या खेळत्या भांडवलात वाढ होण्याची कारणे म्हणजे सभासद संख्या वाढत आहे. त्यामुळे ठेवी व भाग भांडवल वाढत आहे. तसेच कर्ज मर्यादा वाढवली असल्याने कर्ज पुरवठा वाढतो आहे व प्रसंगी बँकेकडून कर्जे घेऊन सभासदांना कर्जे दिली आहेत. या सर्व घटकांमुळे खेळते भांडवल वाढते आहे.

२:६ <u>बाहेरील कर्जे:</u>

सहकारी संस्थेची अंतर्गत वित्तीय साधने महत्त्वाची असली तरी ती पुरेशी नसतात. संस्थांना आपले व्यवहार मोठया प्रमाणावर वाढविण्यासाठी अंतर्गत साधने अपुरी पडतात व आपली अल्पकालीन कर्जाची गरज भागविण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँका व इतर वित्तीय संस्थांकडून कर्जे घेऊन भागवितात.

सहकारी संस्था मूलत: आर्थिक दृष्टया दुर्बल वर्गाच्या मालकीच्या असतात. परिणामी संस्थेच्या सभासदांनी गोळा केलेले भांडवल अपुरे पडते. म्हणून संस्थेस बाहेरून कर्जे घ्यावी लागतात.

पतपेढी संस्थांची अंतर्गत साधने अपुरी असतात. त्यांची सभासद संख्या मर्यादीत असते. तसेच सभासद हे नोकरदार वर्गातील असल्याने त्यांचे उत्पन्न मर्यादित असते. त्यामुळे त्यांच्याकडून मोठया प्रमाणात भांडवल उभारणी होऊ शकत नाही. अशा वेळी पतपेढी संस्था बँकाकडून कर्जे घेतात. परंतु या कर्जावरील व्याजदर १३ ते १६ टक्के असतो परिणामी हे भांडवल महाग पडते. व संस्था सभासदांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करु शकत नाही. तरीही सभासदांची कर्जाला असलेली वाढती मागणी विचारात घेता संस्थेस जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घ्यावे लागते.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था सुध्दा कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन सभासदांची कर्जाची मागणी पूर्ण करते.

ही संस्था १९८०-८१ अखेर आपल्या ठेवी जिल्हा मध्यवर्ती बँकेत चालू खात्यावर जमा करीत असे व त्यातून सभासदांना कर्ज पुरवठा करीत होती. परंतु नंतर सभासद संख्येतील वाढीबरोबर कर्जाला मागणी वाढू लागली व अंतर्गत भांडवल अपुरे पडू लागले. तेव्हा संस्थेने १९८१-८२ नंतर कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून "बँक क्लिन कॅश क्रेडीट" खात्यावर कर्ज घेण्यास सुरवात केली. संस्थेस बँकेने रु. ६०,००,०००.०० एवढे कॅश क्रेडीट मंजूर केले आहे. या कर्जावर बँक १३.५ टक्के व्याजदर आकारते. संस्थेची आर्थिक प्रगती व शंभर टक्के कर्ज वसूली आधारभूत मानून आवश्यकतेप्रमाणे बँक कर्ज पुरवठा करते आहे. संस्थेने कॅश क्रेडीटमधील जेवढ्या कर्जाचा वापर केला असेल तेवढ्याच कर्जावर बँक व्याज आकारते.

संस्थेने बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे स्वरुप पुढील कोष्टकात दाखविले आहे.

कोष्टक नं. ४:३

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेले कर्ज (रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्षे (३० जून) | कर्ज रक्कम | कर्ज रक्कमेतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १) | १९८१-८२ | ८,४३,०५६.८० | — |
| २) | १९८२-८३ | ७,७४,४३३.०९ | – ८.१४ |
| ३) | १९८३-८४ | १२,५२,५४७.३० | ६१.७४ |
| ४) | १९८४-८५ | १६,६९,०८२.९८ | ३३.२५ |
| ५) | १९८५-८६ | ३२,४५,४४१.१० | ९४.४४ |
| ६) | १९८६-८७ | ५१,८३,२३०.४६ | ५९.७१ |
| ७) | १९८७-८८ | ५०,२२,५०५.३१ | – ३.१ |
| ८) | १९८८-८९ | ४७,७९,८२९.०१ | – ४.८३ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९८१-८२ ते १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

कोष्टक क्र. ४:३ वरून असे दिसून येते की, संस्थेने सभासदांची वाढती मागणी विचारात घेऊन सन १९८१-८२ मध्ये कर्ज मर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला परंतु संस्थेकडे असलेल्या ठेवी अपु-या असल्यामुळे संस्थेस कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घ्यावे लागले.

पत संस्थेने १९८१-८२ साली कर्ज मर्यादा ३००० रु. वरून रु.५००० पर्यंत वाढविली. त्यामुळे बँकेकडून रु. ८,४३,०५६.८० एवढे बँक विलन कॅश क्रेडीट कर्ज घेतले. हे कर्ज १३.५० टक्के दराने घ्यावे लागल्यामुळे संस्थेस पूर्वीचा

१२ टक्के व्याजदर बदलून १५ टक्केपर्यंत वाढवावा लागला. म्हणून संस्थेने स्वत:चे भांडवल वाढविण्यासाठी भाग भांडवल मर्यादा १०,००,००० रु. पूर्ण होत आल्याने १९८२-८३ साली भाग भांडवल मर्यादा रु. १५,००,०००.०० पर्यंत वाढविली. त्यामुळे यावर्षी (१९८२-८३) बँकेकडून कमी कर्ज घ्यावे लागले. हे कर्जाचे प्रमाण ८.१४ टक्क्यानी कमी झाले आहे. संस्थेने भांडवल वाढविण्या-साठी पुन्हा १९८४-८५ साली भाग भांडवल मर्यादा रु. २५,००,०००.०० पर्यंत वाढविली. सभासदांच्या मागणीवरून सन १९८५-८६ साली कर्ज मर्यादा रु. १५,०००.०० पर्यंत वाढविल्याने बँकेकडून पूर्वीपेक्षा ९४.४४ टक्के जादा कर्ज घ्यावे लागले. संस्थेने बँककर्ज घेण्याऐवजी आपली भाग भांडवल मर्यादा रुपये ५०,००,०००.०० पर्यंत वाढविल्याने सन १९८७-८८ साली बँक कर्जामध्ये ३.१ टक्क्यानी घट झाली आहे व सन १९८८-८९ मध्ये ४.८३ टक्क्यानी घट झाली आहे. ही गोष्ट संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

संस्थेने सभासदाची कर्जाची गरज भागविण्यासाठी अंतर्गत भांडवल उभारणी करावी म्हणजे सभासदांमध्ये बचत प्रवृत्ती वृध्दींगत करावी, शक्यतो सक्तीच्या दीर्घ मुदतीच्या ठेवी ठेवण्यास सभासदांना उत्तेजन द्यावे की ज्यामुळे जादा व्याज दराचा भुर्दंड सभासदांना बसणार नाही.

.......